# महाराष्ट्र शासन

क्रमांक : टिपीबी-४३१९/प्र.क्र.१९६/२०१९/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ३१/१२/२०१९.

प्रति,
**आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १७ अन्वये समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास करताना जमिन मालकाचे ताब्यात शिल्लक राहणारे क्षेत्रावरील परवानगीयोग्य बांधकाम क्षेत्राबाबत स्पष्टता करण्याबाबत.

महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या समावेशक आरक्षणाच्या विनियम १७ मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेस/ समुचित प्राधिकरणास जमीन मालकाकडून बांधीव सुविधेसह / मोकळे क्षेत्र हस्तांतरण केले जाते ते विचारात न घेता संपूर्ण भूखंडाचा चटई क्षेत्र निर्देशांक जमीन मालकास त्याचे उर्वरित क्षेत्रावर अनुज्ञेय रहातो. बांधीव सुविधा क्षेत्रासाठी Amenity TDR देणेची तरतूद असल्याने त्याप्रमाणे स्वतंत्ररित्या कार्यवाही होते. महानगरपालिका/ समुचित प्राधिकरणास हस्तांतरण केलेले क्षेत्र वजावट करता जमीन मालकाचे ताब्यातील क्षेत्रामध्ये (Balance Plot) विनियम १७(१)(a)व(b) ची तरतूद विचारात घेता अनुज्ञेय करावयाच्या चटई क्षेत्र निर्देशांकाचे परिगणनेच्या अनुषंगाने अनौपचारिकरित्या महानगरपालिकेकडून स्पष्टीकरणाची मागणी होत असलेने त्याबाबत खालीलप्रमाणे कळविण्याच्या मला सूचना आहेत.

"समावेशक आरक्षणाचे माध्यमातून (AR) विकास करताना त्यामधील तरतुदीनुसार जमीन मालकाचे ताब्यातील क्षेत्रावर त्याच्या आरक्षित असलेल्या क्षेत्राचा संपूर्ण चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. जमीन मालकास मंजूर विनियमाच्या इतर तरतुदीनुसार त्याच्या ताब्यातील क्षेत्राचा (Balance Plot) विकास करावयाचा असलेस, असा विकास त्याच्या ताब्यातील क्षेत्र विचारात घेवून सदर विनियमानुसार अनुज्ञेय होणाऱ्या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाचे मर्यादेमध्येच त्याच्या ताब्यातील क्षेत्रावर परिगणित होणारा एकंदर चटई क्षेत्र निर्देशांक राहिल याप्रमाणे अनुज्ञेय आहे."

आपला,

(निर्मलकुमार पं. चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव :-**

१) प्रमुख अभियंता ( वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका.
२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
३) निवडनस्ती (नवि-१)